# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक २९.०८.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २८/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६७ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४७,३००/- रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२८/०८/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन हटटा येथे ०१ तसेच पोस्टे आ.बाळापुर येथे ०१ असे एकुण ०२ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ५.७६ लिटर दारू असा एकुण ३,०२०/-रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि. २८/०८/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे हिंगोली शहर येथे ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रू.व २१ मोबाईल ,०२ मोसा असा एकुण ४,३८,७३०/-रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी** :-दिनांक २८/०८/२०२२ रोजी फिर्यादी राजकुमार शंकरराव पोटले रा. किन्होळा ता.वसमत जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत ग्रा.येथे कलम ३९४,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२८.०८.२२ रोजी चे ०२:४५ ते ०३:०० वा चे दरम्याण मौजे किन्होळा येथे फिर्यादीचे राहते घरी तीन अज्ञात इसमांनी फिर्यादीच्या घरावरील पत्रे काढुन आत प्रवेश करून फिर्यादीच्या उजव्या माडीवर रॉड मारून चाकुचा धाक दाखवुन कपाटात ठेवलेले व फिर्यादीच्या पत्नीच्या अंगावरील दागीणे व नगदी रू असा एकुण १,७०,००० रू मुद्देमला चोरून नेले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत ग्रा.पोलीस तपास करित आहेत.